## श्री. आशिष वानखेडे, तहसिलदार, नागपूर (ग्रामीण) यांचे कार्यालय, नागपूर

रा.मा.क्र. ५२/एन.ए.पी.-३४/२०२२-२०२३
मौजा –चिचोली, प. ह. नं.- ४अ
दिनांक- १८ नोव्हेंबर, २०२२

**वाचा :** मा.जिल्हाधिकारी,नागपूर यांचे अधिकार प्रदान आ देश क्रं.प्रस्तुत/कावि-१४६९/२२, दि.१९/०९/२०२२.

**महाराष्ट्र जमीन महसूल संहिता,१९६६, च्या कलम -४२-अ मधील तरतुदीन्वये नियोजन प्राधिकरणाने बांधकाम/विकास परवानगी दिली आहे, अशा जमिनीच्या भोगवटदारास द्यावयाचा सनदेचा नमुना.**

ज्याअर्थी, जिल्हा- नागपूर, तालुका-नागपूर (ग्रामीण), मौजा-**चिचोली**, प. ह. नं. ४अ च्या शेत सर्व्हे क्रमांक ६७, ६८/१, ६८/२, एकुण आराजी १.७२ हे. आर. (१७२००.०० चौ. मी.) या जमिनीच्या भोगवटादाराने महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ४२-अ च्या तरतुदीन्वये, **"निवासी"** अकृपक प्रयोजनासाठी सदर जमिनीचा विकास करण्यास कार्यकारी अभियंता-१, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नागपूर यांचे अंतिम मंजूरी अहवाल क्र.का.अभि./नामप्रविप्रा/७६६८, दिनांक-१३/१०/२०२२, न्वये विकास/बांधकाम परवानगी प्राप्त केली आहे. ज्यासंबंधी नियोजन प्राधिकरणाने मंजूर केलेला नकाशा या सनदेसोबत संलग्न आहे. मंजूर अभिन्यासाच्या क्षेत्राचे विवरण खालील प्रमाणे आहे.

| AREA STATEMENT | | | | |
|---|---|---|---|---|
| 1. | AREA OF LAND | | | |
| | A) AS PER OWNERSHIP DOCUMENT (7/12, CTS EXTRACT) | 17200.000 | SQ.M | |
| | B) AS PER MEASUREMENT SHEET | 14871.343 | SQ.M | |
| | C) AS PER SITE | 14871.343 | SQ.M | |
| 2. | DEDUCTIONS FOR | | | |
| | A) PROPOSED D.P./D.P. ROAD WIDENING AREA | 758.862 | SQ.M | |
| | B) ANY D.P. RESERVATION AREA | 0.000 | SQ.M | |
| | (TOTAL a+b) (-) | 758.862 | SQ.M | |
| 3. | BALANCE AREA OF PLOT (1-2) | 14112.481 | SQ.M | 100.000 |
| 4. | AMENITY SPACE | | | |
| | A) REQUIRED | 0.000 | SQ.M | |
| | B) ADJUSTMENT OF 2(b), IN ANY- | 0.000 | SQ.M | |
| | C) BALANCE PROPOSED | 0.000 | SQ.M | 0.000 |
| 5. | NET PLOT AREA (3-4(c)) | 14112.4810 | SQ.M | |
| 6. | RECREATIONAL OPEN SPECE | | | |
| | A) REQUIRED (10% OF 3) | 1411.248 | SQ.M | |
| | B) PROPOSED | 1428.148 | SQ.M | 10.120 |
| 7. | INTERNAL ROAD AREA | 3818.3060 | SQ.M | 27.056 |
| 8. | SERVICE ROAD & HIGHWAY WIDENING | 0.000 | SQ.M | 0.000 |
| 9. | PLOTABLE AREA | 8810.682 | SQ.M | 62.432 |
| 10. | PRO-RATA FACTOR FOR FSI CALCULATION ON LAYOUT PLOTS = (5/9) | 1.6017 | SQ.M | |
| 11. | SPACE FOR ECLECTRIC SUB-STATION & WWTP - | 55.345 | SQ.M | 0.392 |

ज्याअर्थी, उक्त जमिनीच्या भोगवटादाराने शासनाला, उक्त संहितेच्या कलम ४७-अ नुसार देय रुपांतरण कराची व वर नमुद **"निवासी"** अकृषक प्रयोजनार्थ वापरापोटी आकारणीची रक्कम पुढील प्रमाणे निर्धारित करण्यात येते.

उपरोक्त प्रमाणे जागेचे एकुण क्षेत्रफळ/आराजी १.७२ हे. आर. (१७२००.०० चौ. मी.) "निवासी" प्रयोजनार्थ अकृषक सारा आकारणी करावयाचे क्षेत्र म्हणजेच ८८१०.६८२ चौ. मी. (AREA UNDER PLOT ८८१०.६८२ + AMENITY SPACE PROPOSED ०.०० = ८८१०.६८२ ) चौ. मीटरला १० पैसे प्रति चौ. मीटर याप्रमाणे अकृषक महसूल कर रुपये ८८२/-, ग्रामपंचायत कर अकृषक करा एवढा रुपये ८८२/-, जिल्हा परिषद सेस सारा ७ पट अकृषक कराच्या रुपये ६,१७४/- परावर्तीत कर अकृषक साऱ्याचे ५ पट म्हणजेच रुपये ४,४१०/- असे एकूण रुपये १२,३४८/- आकारणी निर्धारित होते.

त्याअर्थी आता, उक्त संहितेमधील तरतुदीच्या आणि तदन्वये करण्यांत आलेल्या नियमांच्या तरतुदीनुसार आणि खालील शर्तींना अधीन राहून उपरोक्त जमिनीच्या भोगवटदारास सदर नियोजन प्राधिकाऱ्यावर वर उल्लेखित विकास/बांधकाम परवानगीच्या अनुषंगाने सदर जमिनीवर अनुज्ञेय करण्यांत आलेल्या "निवासी" अकृषक वापरापोटी उक्त संहितेच्या कलम ४२-अ अन्वये नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, यांनी दिलेल्या अटी व शर्तींच्या अधिन राहून ही सनद देण्यात येत आहे.

१. आकारणी उक्त जमिनीचा भोगवटदार उक्त जमिनीच्या संबंधात या अगोदर वसूली योग्य असलेल्या आकारणी ऐवजी वर उल्लेखीत विकास/बांधकाम परवानगी प्राप्त झाल्यापासून दिनांक **३१ जुलै २०२३** (वर्ष) रोजी संपणाऱ्या जमीनीच्या कालावधीत शासनाला प्रत्येक वर्षी रुपये ८८२/- **(रुपये आठशे ब्यांशी फक्त)** या दराने परिगणीत होणारी वार्षिक आकारणी देईल आणि उक्त कालावधी संपल्यानंतर, उक्त संहिते अन्वये जिल्हाधिकाऱ्यांकडून, वेळोवेळी निश्चित करण्यांत येईल, अशी सुधारित आकारणी देईल.

२. उक्त जमिनीचा भोगवटदार उक्त जमिनीवर वसूली योग्य असलेली सर्व कर, दर आणि उपकर भरील.

३. वरीलप्रमाणे मंजूर केलेल्या वापरामध्ये किंवा वापराच्या क्षेत्रामध्ये नियोजन प्राधिकरणाच्या पूर्व मंजूरी शिवाय कोणताही बदल करु नये व ही सनद निर्गमित झाल्यानंतर नियोजन प्राधिकरणाच्या पूर्व मान्यतेने सदर जमीनीच्या वापराच्या क्षेत्रामध्ये कोणताही बदल झाल्यास त्याची माहिती, असा बदल नियोजन प्राधिकरणाकडून मंजूर झाल्यापासून ३० दिवसांच्या आत जिल्हाधिकारी यांना देणे भोगवटादारावर बंधनकारक राहील.

४. सदर जमिनी या नागरी जमीन कमाल धारणा व कोर्ट ऑफ वार्डस मध्ये बाधित होत असल्यास सदर अकृषक आकारणी रद्द करण्यात येईल.

५. उक्त जमिनीच्या भोगवटादाराने पूर्वगामी शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचे उल्लंघन केल्यास जिल्हाधिकाऱ्यास, उक्त संहितेच्या आणि तदन्वये, करण्यांत आलेल्या नियमांच्या तरतुदीन्वये जी भरण्यास उपयोगकर्ता दायी असेल अशी इतर कोणत्याही शारतीस बाधा न आणता त्यास वाटेल अशी आकारणी भरल्यावर आणि कलम ३२९ च्या पोटकलम (२) च्या अधिनतेने, त्यास योग्य वाटेल एवढा दंड भरल्यानंतर उक्त जमीन भोगवटदार यांच्या वहीवाटीत असल्याचे चालू ठेवता येईल.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव



त्याची साक्ष म्हणून **नागपूर** जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी/जिल्हाधिकाऱ्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने या ठिकाणी महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे वतीने स्वाक्षरी केली आहे, आणि त्यांच्या पदाची मोहोर लावली आहे आणि अर्जदाराने सुद्धा दिनांक- **१८ नोव्हेंबर, २०२२** रोजी त्याची स्वाक्षरी येथे केलेली आहे.

**(भोगवटादाराची स्वाक्षरी)**

**मे. प्रिमियर हेरीटेज तर्फे पार्टनर**

**श्री. अमित मगनलाल पंचमतीया**

(साक्षीदारांची स्वाक्षरी व नांव)

अ) ____________

श्री./श्रीमती कमलेश इन्द्रकुमार खनकर

ब) Harshal

श्री./श्रीमती Harshal P. Hedaoo

(साक्षीदारांची स्वाक्षरी व नांव)

अ) ____________

श्री./श्रीमती कमलेश इन्द्रकुमार खनकर

ब) Harshal

श्री./श्रीमती Harshal P. Hedaoo

आम्ही जाहोर करतो की, ज्याने सनदेवर स्वत: अर्जदार **मे. प्रिमियर हेरीटेज तर्फे पार्टनर श्री. अमित मगनलाल पंचमतीया, रा. १, अजंता फार्म, पुनम चेंबर्सच्या समोर, बैरामजी टाऊन, नागपूर-४४००१३** यांनी स्वाक्षरी केलेली आहे. ती अ व ब व्यक्ती, तीच व्यक्ती आहे आणि त्याने या ठिकाणी आमच्या समक्ष त्याची स्वाक्षरी केलेली आहे.

ASHISH SUKHDEORAO WANKHEDE
Digitally signed by ASHISH SUKHDEORAO WANKHEDE
Date: 2022.11.18 18:36:29 +05'30'

**तहसिलदार,**
**नागपूर (ग्रामीण)**

प्रतिलीपी :

१. मा. जिल्हाधिकारी, नागपूर (अकृषक शाखा) यांना माहितीस सविनय सादर.
२. मा. कार्यकारी अभियंता -१, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नागपूर यांना माहितीस सविनय सादर.
३. ग्राम अधिकारी सा. क्रं. ४अ, मौजा-**चिचोली** यांना सदर आदेशाची नोंद गाव नमुना२ मध्ये नोंद घेण्यास व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.
४. सह. जिल्हा निबंधक श्रेणी — २, क्रं. ७ व १० नागपूर (ग्रामीण) यांना माहितीकरीता अग्रेषित.
५. उप अधिक्षक भूमी अभिलेख, नागपूर (ग्रा.) यांना माहितीस व उचित कार्यवाहीस अग्रेषित.
६. अर्जदार **मे. प्रिमियर हेरीटेज तर्फे पार्टनर श्री. अमित मगनलाल पंचमतीया, रा. १, अजंता फार्म, पुनम चेंबर्सच्या समोर, बैरामजी टाऊन, नागपूर-४४००१३** यांना माहिती तथा उपरोक्त अटी व शर्तीच्या पुर्तता व अंमलबजावणी करण्यासाठी तसेच अकृषक कराची रक्कम १२,३४८/- चलानचे स्वरुपात शासन जमा करण्याकरीता रवाना.

ASHISH SUKHDEORAO WANKHEDE
Digitally signed by ASHISH SUKHDEORAO WANKHEDE
Date: 2022.11.18 18:36:49 +05'30'

**तहसिलदार,**
**नागपूर (ग्रामीण)**